# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 22/07/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग २ - रजा

6096

क्र. प्रलि/५१-डी/परिवर्तीत रजा/सपोनि-दिपमाला भेंडे/ /२०२० यवतमाळ, दिनांक - 22 JUL 2020

## आदेश

सहायक पोलीस निरीक्षक/दिपमाला सुरेश भेंडे, नियंत्रण कक्ष, यवतमाळ हया स्वत:चे आजारपणामुळे दि.१७/०६/२०२० ते १८/०६/२०२० पर्यत ०२ दिवस वैद्यकीय रजेवर होत्या. त्यांनी उपचाराबाबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवरुन त्यांचा रुग्णनिवेदनाचा ०२ दिवसाचा कालावधी वैद्यकीय कारणास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, नियम क्र.६१ अनुसार परिवर्तीत रजा म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये )**

**( सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

**सहायक पोलीस निरीक्षक/दिपमाला सुरेश भेंडे, नियंत्रण कक्ष, यवतमाळ**

प्रत-वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

6098

क्र. प्रलि/५१-डी/परिवर्तीत रजा/पोउपनि-तोगरवाड/ /२०२० यवतमाळ, दिनांक - 22 JUL 2020

## आदेश

**पोलीस उप निरीक्षक/गिरीश मोगलाजी तोगरवाड, पोस्टे.वडगांव जंगल** हे स्वत:चे आजारपणामुळे दि.०४/०७/२०२० ते १४/०७/२०२० पर्यंत ११ दिवस वैद्यकीय रजेवर होते. त्यांनी उपचाराबाबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवरुन त्यांचा रुग्णनिवेदनाचा ११ दिवसाचा कालावधी वैद्यकीय कारणास्तव, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, नियम क्र.६१ अनुसार परिवर्तीत रजा म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये )**

**( सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

पोलीस उप निरीक्षक/गिरीश मोगलाजी तोगरवाड, पोस्टे.वडगांव जंगल

प्रत-वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

6100

क्र. पोअय/प्रलि/५१-डी/रजा/पोनि-श्री.घुगे/ /२०२० यवतमाळ, दिनांक - 22 JUL 2020

## आदेश

पोलीस निरीक्षक/ज्ञानदेव माणिकराव घुगे, नियंत्रण कक्ष, यवतमाळ हे आजारपणाचे कारणास्तव १४/०६/२०२० ते ०२/०७/२०२० पर्यंत १९ दिवस रजेवर होते. त्यांचा सदरचा १९ दिवसांचा रजा कालावधी **विनावेतन** करण्यात येत आहे.

(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)

**( सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

प्रति,

**पोलीस निरीक्षक/ज्ञानदेव माणिकराव घुगे, नियंत्रण कक्ष, यवतमाळ**

प्रत-वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

क्र. प्रलि/५१-डी/परिवर्तीत रजा/-सपोनि-गाडामोडे(स्वेच्छा-सेनि.)/ 6099 /२०२० यवतमाळ, दिनांक - 22 JUL 2020

## आदेश

सहायक पोलीस निरीक्षक/मुरलिधर जयराम गाडामोडे, नेमणूक पोस्टे.वणी (स्वेच्छा सेवानिवृत्त दि.२६/०५/२०२०) हे स्वतःचे आजारपणामुळे दि.२९/१०/२०१९ ते १२/०५/२०२० पर्यंत १९७ दिवस वैद्यकीय रजेवर होते. त्यांनी उपचाराबाबत सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवरुन त्यांचा रुग्णनिवेदनाचा १९७ दिवसाचा खालील प्रमाणे नियमित करण्यात येत आहे.

१.दि.२९/१०/२०१९ ते २८/०४/२०२० :- १८३ दिवस परिवर्तीत रजा (वैद्यकीय कारणास्तव)

२.दि.२९/०४/२०२० ते १२/०५/२०२० :- १४ दिवस अर्जित रजा

(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये)

**( सुशिला पवार)**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

**सहायक पोलीस निरीक्षक/मुरलिधर जयराम गाडामोडे , नेमणूक पोस्टे.वणी (स्वेच्छा सेवानिवृत्त दि.२६/०५/२०२०) तत्कालीन नेमणूक पोस्टे.वणी (मार्फत-ठाणेदार, पोस्टे.वणी)**

प्रत-ठाणेदार, पोस्टे.वणी/वेतन लिपिक-२/डिपीजी लिपिक यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक पोअय/पलि-२/वा.वे वाढ/२०२० 6063 यवतमाळ दिनांक 22 JUL 2020

**आदेश**

या कार्यालयाचे आदेश क्र.पोअय/पलि-२/कार्या.कर्म/वा.वे.वाढ-२०/५२२० दिनांक १.७.२०२० अन्वये खालील लिपीकांचे दिनांक १.७.२०२० पासुन वेतन वाढ मंजुर करण्यात आली होती. परंतु सदर लिपीकाचे वेतन वाढ रोखण्यासंबधीचे आदेश झाले असल्याने. सदर आदेशान्वये मंजुर करण्यात आलेली वेतन वाढ **रद्द** करण्यात येत आहे.

१.श्री अरविंद कोठेकर वरिष्ठ श्रेणी लिपीक
२.श्री.सै.ईशरतुल्ला सै.रहेमतुल्ला कनिष्ठ श्रेणी लिपीक
३.श्री.सुशिल मुदावणे कनिष्ठ श्रेणी लिपीक
४.श्री अंकुश ठाकरे कनिष्ठ श्रेणी लिपीक

**( एम. राज कुमार )**
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति
वेतन लिपीक -२/डिपीजी लिपीक यांना माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव
प्रत:- वरिल संबधीत लिपीक

क्र. पोअय/डीपी/३१-बी/नि.काळ/से.नि.पोहवा/१०७९ पाईकराव/6075 /२०२०
पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालय, एल.आय.सी. चौक यवतमाळ
दुरध्वनी क्रमांक:-०७२३२-२५६७०० फॅक्स क्रमांक:-०७२३२-२५६७१०
ई मेल आय डी :- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 22 JUL 2020

## आदेश

**संदर्भ**:- या कार्यालयाचे आदेश क्र. डीपी/३१-बी/१०७९-सुभाष/निलंबन/२०१२, दिनांक १/०४/२०१२.

**विषय** :- निलंबन काळ निश्चित करण्याबाबत.
सेवानिवृत्त पोहवा/१०७९ सुभाष पाईकराव, तत्का.नेमणुक पो.स्टे. वडगाव रोड.

--ooo--

सेवानिवृत्त पोहवा/१०७९ सुभाष पाईकराव, तत्का.नेमणुक पो.स्टे. वडगाव रोड येथे कार्यरत असतांना त्यांनी डयुटी व्यवस्थीत पार पाडली नाही. तसेच ते सतत गैरहजर असुन जप्त केलेला मुददेमाल मा. न्यायालयात वेळेत सादर न करता सतत कर्तव्यात बेजबाबदारपणा व हलगर्जीपणा केल्याने संदर्भीय आदेशान्वये दि.१६/०४/२०१२ रोजी आदेश स्विकारल्याचे दिनांकापासुन निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर प्राथमीक चौकशीचे अधिन राहुन त्यांना दि.१८/१०/२०१२ रोजी निलंबनातुन मुक्त करण्यात आलेले आहे.

प्रकरणी पोहवा/१०७९ सुभाष पाईकराव, तत्कालीन नेमणुक पो.स्टे. वडगाव रोड हे दिनांक ३१/०७/२०१८ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे सदर प्रकरण नस्तीबंध करण्यात येवुन त्यांचा **दिनांक १६/०४/२०१२ ते १८/१०/२०१२ दिनांक पर्यतचा निलंबन कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (बडतर्फी , निलंबन, सेवेतून काढून टाकणे व त्या कालावधीची प्रदाने) नियम १९८१ चे नियम तरतूदीनुसार कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.**

**( एम.राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,** सेवानिवृत्त पोहवा/१०७९ सुभाष पाईकराव, रा.प्लॉट नं. ३१, पांडे ले आऊट ,चौसाळा रोड, उन्नती पार्क चे बाजुला, बोधड शिवार, यवतमाळ.

**मार्फत** :- रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ.

**२/** यासोबत आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यांत येत असुन मुळ प्रत सबंधितास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयांस परत करावी.

**प्रतः-** पेंशन लिपीक /कर्मचारी आस्थापना लिपीक /आस्था लिपीक-०२/ डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीसाठी.

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/पोहवा-१४५५ उत्तम मडावी/6073 /२०२० यवतमाळ दि. 22 JUL 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** पोहवा/१४५५ उत्तम मडावी, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण.

**दोषारोप :-**

**१)** आपण पोहवा/१४५५ उत्तम मडावी, पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण येथे कार्यरत असतांना दिनांक १०/१२/२०१४ रोजी १४.०० ते २०.०० वा. स्टेशन डायरी डयुटी असतांना श्रीमती सपना बावणे, चाईल्ड लाईफ यवतमाळ यांनी पो.स्टे. ला फोनव्दारे माहीती दिली की, भासकर न्याहारे व कल्पना मेश्राम दोन्ही रा. बाभुळगाव हे मोटर सायकलने घाटंजी रोडने यवतमाळ कडे येत असतांना सावरगढ शिवारात एक पुरुष जातीचे नवजात जिवंत मुल बेवारस स्थितीत मिळुन आल्याने त्यांचेवर उपचार होणेकामी नवजात बाळासह पोलीस स्टेशन येथुन तक्रार दिली सदर प्रकरणातील लेखी तक्रार ठाणेदार यांनी संबधीत प्रकरणात कलम ३१७ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्याबाबत सदर तक्रारीवर शेरा लिहुन आदेश दिले असतांना सुध्दा आपण गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे गुन्हा दाखल होणेस उशिर झाला आहे. तसेच आपण वरिष्ठांच्या आदेशाीच अवहेलना करुन गंभीर कसुरी केली आहे.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/पोहवा१४५५/२०१५, दिनांक २८/०१/२०१५ अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर प्राथमीक चौकशीत अपचारी यांनी वरिष्ठांचे आदशाची वेळीस दखल न घेतल्यामुळे गुन्हा दाखल करण्यास विलंब झाल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस खात्यात असता अशोभनीय व गैरशिस्तीच्या वर्तना बाबत **आपणास पुढील देय वेतनवाढ ०२ वर्षाकरीता (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) तसेच आपला निलंबन कालावधी दिनांक २८/०१/२०१५ ते ०२/०४/२०१५ हा जसाचा तसा का करण्यात येवु नये?** म्हणुन दिनांक २८/०७/२०१५ अन्वये कादानो देण्यात आली. करिता खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे, अपचारी पोहवा/१४५५ उत्तम मडावी, यांना उपरोक्त कसूरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले ) नियम १९५६ मधिल तरतूदीनुसार **"सक्त ताकीद" ही शिक्षा देत आहे. तसेच निलंबन कालावधी दिनांक २८/०१/२०१५ ते ०२/०४/२०१५ पावेतोचा जसाच्या तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

सदर प्रकरणी शिक्षेविरुध्द अपिल अनुज्ञेय नाही.

**( एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रती:-** **पोहवा/१४५५ उत्तम मडावी,** नेमणुक पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण.
**मार्फत :-** ठाणेदार, पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण.
**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवुन ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी
**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /सआली-०३/वेतन लिपीक- १ /डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/पोशि-२४३७ दिनेश चव्हाण/ 6072 /२०२० यवतमाळ दि. 22 JUL 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** पोशि/२४३७ दिनेश चव्हाण, नेमणुक महामार्ग उमरखेड.

**दोषारोप :-**

**१)** आपण पोशि/२४३७ दिनेश चव्हाण, पोलीस स्टेशन पुसद शहर कार्यरत असतांना पोलीस स्टेशन पुसद शहर येथील मुलगी पळविल्याचे प्रकरणात निरज श्रीराम चंद्रवंशी, रा. श्रीरामपुर यांचे मुलाचा सहभाग असल्याचे सांगुन त्यांचे नाव सदर प्रकरणातुन काढुन टाकतो म्हणुन सदर प्रकरणी आपण त्यांचे नातेवाईकाकडुन (मारोती भस्मे) नगद रुपये ९०००/- घेतल्याचे निष्पन्न झाले.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/२४३७/प्राचौ/२०१४, दिनांक २०/०२/२०१४ अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर प्राथमीक चौकशीत अपचारी हे अर्जदार यांचे मुलीचे पळवुन नेण्याबाबतचे तक्रार अर्जात निरज यांचे नाव असल्याचे अर्जदार सौ. सुनंदा सुर्यवंशी यांना सांगुन नाव कमी करायचे असल्यास पैश्याची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस खात्यात असता अशोभनीय व गैरशिस्तीच्या वर्तना बाबत **आपणास पुढील देय वेतनवाढ ०२ वर्षाकरीता (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) तसेच आपला निलंबन कालावधी दिनांक २०/०२/२०१४ ते १८/०३/२०१४ हा जसाचा तसा का करण्यात येवु नये?** म्हणुन दिनांक ०४/०४/२०१५ अन्वये कादानो देण्यात आली. सदरची कादानो दि.१८/०६/२०१५ रोजी स्विकारुन त्यावर स्पष्टिकरण या कार्यालयास सादर केलेले नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे, अपचारी पोशि/२४३७ दिनेश चव्हाण, यांना उपरोक्त कसूरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले ) नियम १९५६ मधिल तरतूदीनुसार **"सक्त ताकीद" ही शिक्षा देत आहे. तसेच निलंबन कालावधी दिनांक २०/०२/२०१४ ते १८/०३/२०१४ पावेतोचा जसाच्या तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

सदर प्रकरणी शिक्षेविरुध्द अपिल अनुज्ञेय नाही.

**( एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रती:-** **पोशि/२४३७ दिनेश चव्हाण,** नेमणुक महामार्ग उमरखेड.
**मार्फत :-** प्रभारी अधिकारी, महामार्ग उमरखेड.
**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी
**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /सआली-०५/वेतन लिपीक- १ /डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.

क्रमांकः-डिपी/३१-बी/अं.आ./ क.श्रे.लि. अंकुश ठाकरे/ 6074 /२०२० यवतमाळ, दिनांक- 22 JUL 2020

## अंतिम आदेश

**वाचा** :- या कार्या.क्र. पोअय/डिपी/३१-बी/प्रा.चौ/मुदावणे+१/ज्ञापन/५२९९/२०२०, दि.०२/०७/२०२०.

**कसुरीचे स्वरूपः-**

आपण **श्री. अंकुश ठाकरे क. श्रे. लि.** सध्या नेमणुक आस्थापना शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ. राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचे दि. ०९/०६/२०२० चे अहवालावरुन आपणास अपर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे आदेशान्वये नविन बिल्डींग क्र.०३ निवासस्थान क्र.४१ हे दि.२०/१०/२०१८ रोजी वाटप करण्यात आले आहे. परंतु आपण श्री. सुशिल मुदावणे यांचे सोबत पोउपअधि (मुख्या), यवतमाळ यांचे कक्षात जावुन निवासस्थानाचा ताबा घेतला नसल्याने घरभाडे वसुली लावण्यात येवु नये असे कथन केले. आपण जर शासकीय निवासस्थानामध्ये राहत नव्हते तर निवासस्थान न घेतल्याबाबतचा अर्ज वरीष्ठांना सादर करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात आपण तसे न करता आपला मित्र राम भेंडे (खाजगी व्यक्ती ) यांचे सोबत त्या शासकीय निवासस्थानात राहत असुन त्यांचे ईलेक्ट्रीक बिल सुध्दा भरत होता. आपण उपरोक्त प्रमाणे खोटे कथन करुन वरीष्ठांची दिशाभुल केली आहे. आपण वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे आपण नेमलेल्या कर्तव्यात दुषीत हेतुने बेजबाबदार, बेशिस्त वर्तणुकीचे कृत्य करुन वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन केले असल्याचे केलेल्या प्राथमिक चौकशीत दिसुन आले आहे. आपल्या अशा कर्तव्यातील वृत्तीला आळा बसने गरजेचे आहे. आपण म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम-३ चे उल्लंघन केले आहे. म्हणून म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) मधिल तरतुदीनुसार पुढील **देय वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगितीची** शिक्षा प्रस्तावित शिक्षेबाबत दिनांक ०२/०७/२०२० अन्वये ज्ञापन देण्यात आले होते. सदर ज्ञापन स्विकारून ज्ञापनाचे अभिवेदन आपण दिनांक ०९/०७/२०२० रोजी सादर केले. सदर अभिवेदनाचे अवलोकन केले असता, ते पुर्णतः समाधानकारक दिसुन येत नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे **अंकुश ठाकरे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना त्यांच्या उपरोक्त कसूरीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) (चार) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता स्थगिती "(अपरिणामकारक) शिक्षा** देत आहे. सदर शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा वगळून व नैमत्तीक रजा सोडून अंमलात येईल.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून **४५** दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**( एम. राज कुमार )**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रति,** **श्री. अंकुश ठाकरे,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**मार्फत :- प्रमुख लिपीक, कर्मचारी आस्थापना शाखा, पो.अ.कार्या. यवतमाळ.**

२/- सोबत आदेशाच्या ०२ प्रती पाठविण्यांत येत असुन एक प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून विनाविलंब इकडिल कार्यालयास सादर करावी.

**प्रत :-** मंत्रालयीन कर्म.आस्था.लिपीक/ वेतन लिपीक (लिपीक कर्म.)/राजपत्र लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.

क्रमांकः-डिपी/३१-बी/अं.आ./ क.श्रे.लि.इशरत सैय्यद/ 6076 /२०२० यवतमाळ, दिनांक- 22 JUL 2020

# अंतिम आदेश

**वाचा** :- या कार्या.क्र. पोअय/डिपी/३१-बी/प्रा.चौ/मुदावणे+१/ज्ञापन/५०६५/२०२०, दि.२६/०६/२०२०.

**कसुरीचे स्वरूपः-**

आपण **श्री. सय्यद इशरतुल्ला सय्यद रहेमतुल्ला** क. श्रे. लि. नेमणुक लेखा शाखा पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ येथे वेतन लिपीक-०२ म्हणुन कार्यरत असुन १) व.श्रे.लि. परमेश्वर देशमुख, २) व.श्रे.लि. अनिल पेन्दोर, ३) क.श्रे.लि. श्रीमती सुषमा राजगडकर, ४) क.श्रे.लि. श्रीमती सरीता सुर्यवंशी, ५) क.श्रे.लि. सुशिल मुदावणे, ६) क.श्रे.लि. अंकुश ठाकरे, ७) क.श्रे.लि. पंकज गिरी असे एकुण ०७ मंत्रालयीन कर्मचारी यांना पोलीस वसाहत यवतमाळ येथील शासकीय निवासस्थान वाटप करण्यात आले असतांना सुध्दा आपण त्यांना नियमाप्रमाणे घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसतांना त्यांचे वेतनामध्ये नियमीत घरभाडे भत्ता देत होते. त्यांचे वेतनामध्ये घरभाडे भत्ता कपात करणे आवश्यक असतांना तसे न करता दुषीत हेतुने व नेमलेल्या कर्तव्यात हलगर्जीपणा, बेजबाबदारपणाचे कृत्य करुन गंभिर स्वरुपाची कसुरी केलेली आहे.

अशा प्रकारे आपण नेमलेल्या कर्तव्यात दुषीत हेतुने बेजबाबदार, बेशिस्त वर्तणुकीचे कृत्य करुन वर्ग-३ च्या पदास न शोभनारे गैरवर्तन केले असल्याचे केलेल्या प्राथमिक चौकशीत दिसुन आले आहे. आपल्या अशा कर्तव्यातील वृत्तीला आळा बसने गरजेचे आहे. आपण म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम-३ चे उल्लंघन केले आहे. म्हणून म.ना.से.(शिस्त व अपिल) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) मधिल तरतुदीनुसार पुढील **देय वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगितीची** शिक्षा प्रस्तावित शिक्षेबाबत दिनांक २६/०६/२०२० अन्वये ज्ञापन देण्यात आले होते. सदर ज्ञापन दिनांक ०३/०७/२०२० रोजी स्विकारून सदर ज्ञापनाचे अभिवेदन आपण दिनांक ०९/०७/२०२० रोजी सादर केले. सदर अभिवेदनाचे अवलोकन केले असता, ते पुर्णतः समाधानकारक दिसुन येत नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे शिक्षेचे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे **सय्यद इशरतुल्ला सय्यद रहेमतुल्ला,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना त्यांच्या उपरोक्त कसूरीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम क्र. ५ (१) (चार) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय होणारी वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता स्थगिती "(अपरिणामकारक) शिक्षा** देत आहे. सदर शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा वगळून व नैमत्तीक रजा सोडून अंमलात येईल.

आपण सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते सदर आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून **४५** दिवसांचे आंत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**( एम. राज कुमार )**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ**

**प्रति,** **श्री. सय्यद इशरतुल्ला सय्यद रहेमतुल्ला,** कनिष्ठ श्रेणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**मार्फत :- प्रमुख लिपीक, लेखा शाखा, पो.अ.कार्या. यवतमाळ.**

**२/-** सोबत आदेशाच्या ०२ प्रती पाठविण्यांत येत असुन एक प्रत संबंधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून विनाविलंब इकडिल कार्यालयास सादर करावी.

**प्रत :-** मंत्रालयीन कर्म.आस्था.लिपीक/ वेतन लिपीक (लिपीक कर्म.)/राजपत्र लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.